जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

**प्रेसनोट क्रमांक - २९८ दिनांक - २६/०७/२०२४**

सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## नामांकीत ब्रोकर कंपन्यांकडील विविध ग्राहकांचे डी मॅट अकाऊंट हॅक करून कोटयावधींची फसवणुक करणा-या प्रमुख आरोपीस चेन्नई तामिळनाडू येथून अटक

सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील गुर नं ३६६/२०२४,भादवि कलम ४२०,४१९ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी) अन्वये दाखल गुन्ह्यामध्ये चेन्नई तामिळनाडू येथून **आरोपी नामे व्यंकटेशन वर्धन** यास अटक केली आहे. सदर आरोपीने पुण्यातील फिर्यादी यांचे डी मॅट अकाऊंटचा प्रायमरी मेल आय डी व प्रायमरी मोबाईल क्रमांक आरोपीने अनधिकृतपणे बदलुन,स्वतःचा मेल आय डी व मोबाईल क्रमांक लिंक करून दाखल गुन्हयातील फिर्यादीचे डी मॅट अकाऊंटवरील शेअर्स स्वतःचे डी मॅट अकाऊंटला ट्रान्सफर केले. दाखल गुन्ह्यातील ७० लाख रूपयांचे शेअर्स अटक आरोपीने फिर्यादीचे सीडीएसएल या डिपॉझीटरीला लिंक असलेले डी मॅट अकाउंट हॅक करून स्वतःचे बजाज सिक्युरिटीज डी मॅट अकाउंटला ट्रान्सफर करून घेवून ते शेअर्स विकुन स्वतःच्या पंजाब नॅशनल बँक खाते क्र.४५५७०००१००४६१०९ या खात्यावर रक्कम वर्ग करून घेतली व चेन्नईमधील वेगवेगळ्या एटीएमव्दारे व चेकव्दारे काढून घेतली.

आरोपी व्यंकटेशन वर्धन याने सिडको पोलीस ठाणे,छत्रपती संभाजीनगर शहर येथील गुरनं.४६९/२०२४ या गुन्ह्यातील फिर्यादी यांचेबरोबर अशाच प्रकारची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.आरोपी व्यंकटेशन वर्धन याने अशाच प्रकारची फसवणूक आणखीन किती व्यक्तीसोबत केलेली आहे आरोपीस डिमॅट अकाउंट आयडी व पासवर्ड सीडीएसएलमधून कशाप्रकारे मिळाला याबाबत पुढील तपास श्री.सुरेश शिंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर सायबर पोलीस करीत आहेत.

**तसेच पुणे शहर सायबर पोलीस स्टेशन यांचेकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अन्य कोणासोबत अशाप्रकारची फसवणूक झाली असल्यास तात्काळ सायबर पोलीस स्टेशन येथे संपर्क करावा.**

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शैलेश बलकवडे मा.पोलीस उपआयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्री.विक्रांत देशमुख,यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील वपो.नि. सुरेश शिंदे,हिमालय जोशी पोलीस उप निरीक्षक,सचिन इनामदार पोलीस अंमलदार,रवि राठोड दिनेश मरकड, सचिन शिंदे यांनी केली